# गड-किल्ल्यांचे फोटो देतील वारशाची किल्ली...

**संवर्धन आणि पर्यटनाला चालना देण्याचे प्रयत्न**

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

आपण पूर्वी जर एवढे वैभव मिळविले होते, तर ते आजही मिळवू शकतो, याचा विश्वास गड-किल्ल्यांची मनोरम छायाचित्रे पाहिल्यावर वाटू लागतो. आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी गड-किल्ल्यांच्या रूपातील आपला संपन्न वारसा टिकवण्याची गरज आहे व त्यासाठी फोटोग्राफी हे प्रभावी माध्यम ठरू शकते, असे उद्‌गार नौदलाच्या पश्चिम विभागाचे प्रमुख व्हाइस ॲडमिरल संग्रामसिंग बैस यांनी प्रभादेवीच्या पु. ल. देशपांडे अकादमीत भरलेल्या 'गिरीवेध' प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी काढले.

सिद्धिशक्ती प्रकाशन आणि चक्रम हायकर्सतर्फे भरविण्यात आलेल्या 'गिरीवेध-२००७' प्रदर्शनात प्रख्यात छायाचित्रकार गोपाळ बोधे यांची तसेच ट्रेकर्सनी काढलेली गड-किल्ल्यांची छायाचित्रे मांडण्यात आली आहेत. प्रदर्शन ८ फेब्रुवारीपर्यंत खुले राहणाऱ्या या प्रदर्शनाचे उद्‌घाटन व्हाइस-ॲडमिरल संग्रामसिंग बैस यांच्या हस्ते रविवारी झाले. त्याप्रसंगी एमटीडीसीचे मॅनेजिंग डायरेक्टर भूषण गगराणी व पर्यटन व्यावसायिक अभिजीत पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. साहस आणि फोटोग्राफी यांचा संगमातून सामर्थ्य आणि वैभवाचे दर्शन येथे घडते आहे, असे व्हाइस ॲडमिरल बैस यावेळी म्हणाले.

गगराणी म्हणाले की, आपले गड-किल्ले हे बसाल्ट पाषाणातून तयार करण्यात आले असल्याने त्यांचे जतन हे नैसर्गिकदृष्ट्या कसोटीचे बनते. रायगडसारखा किल्ला पुन्हा पूर्वीसारखा करायचा झाल्यास आज २०० कोटी रुपयांचा निधी लागेल. तरीही संवर्धनाचे प्रयत्न सुरू आहेत. मुंबईच्या किल्ल्यांचे नूतनीकरण करण्याचे काम सरकारने हाती घेतले आहे. किल्ल्यांच्या संवर्धनाच्या दृष्टीने फोटोग्राफीतून व्यापक दृष्टी मिळू शकते. या कामी बोधे यांची छायाचित्रे तसेच ट्रेकर्सचे योगदान महत्त्वाचे ठरू शकेल.

पर्यटनप्रसारात फोटोग्राफी हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. आतापर्यंत आम्ही काश्मीरमध्ये पर्यटनाचा प्रसार केला, हे प्रदर्शन पाहून मात्र आम्ही यापुढे महाराष्ट्रावरही भर देऊ, असे सामर्थ्य या छायाचित्रांमध्ये आहे, असे उद्‌गार अभिजीत पाटील यांनी काढले.